भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०१/२०१७

**१) प्राणी निदर्यतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २७/०१/२०१७ चे २१.२० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये गोंवस जनावरे गायी १४, गोरे १०, बैल ८ असे एकुन कि. १०,७०००/–रू ची जनावरे कोंबुन निदर्यतेने कत्तली करीता वाहतुक करतांना मिळाला यातील आरोपी ड्रायव्हर ने गोवंस जनावरे वाहतुकी संबंधी कोणतेही वैदय कागदपत्र, लायन्स जवळ न बाळगता मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी रिझवी स्था.गु.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(ड) ई प्राण्यांना निदर्यतेने वागवीण्याचा कायदा सहकलम ५ (अ)(१) महा.प्रा. सं.(सुधारणा) अधिनीयम १९९५ सहकलम ६६/१९२,,१३०/१७७,१३०(१)/१७७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) ५५,५१३/–रू. चे आर्थीक नुकसान.करून फसवनुक केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०१३ ते २०१७ दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी सौ. मंगला जयप्रकाश समरीत वय ४२ वर्ष रा. डोंगरगाव यांचे सन २०१३ ते २०१५ मधील एलआयसी ची एकुन ३६,०६०/–रू. भरण्याच्या खोटया पावत्या तंयार करून ३ वर्षा चे वार्षीक किस्त त्यावरील व्याज व पॉलीसी नियमीत करण्याकरीता एकुन ५५,५१३/–रू ची भारतीय जिवन विमा निगम कंपनीत भरण्यास भाग पाडुन, त्याची आर्थीक नुकसाान करून फसवनुक केल्याचे फिर्यादीने मा. न्यायालयास दिलेल्या लेखी तक्रारी वरून व मा. जेएमफसी सा. मोहाडी यांनी कलम १५६(३) भादवी प्रमाने कलम ४२०,४६८,४७१ भादवी.अन्वये पोलीस स्टेशन आंधळगाव येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोअवा. बाबरे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) निष्काळजीपने चार चाकी वाहन चालवुन मोटार सायकलला धडक देवुन इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक २८/०१/२०१७ रोजी चे १६.१० वा. दर. यातिल आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने व भरधाव वेगाने चालवुन होंन्डा शाईन मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ४९२० ला धडक मारून नंतर फिर्यादी जखमी याचे मोटार सायकल क्र. एमएच ४० बी ६०७३ ला धडक मारून त्यास जखमी करून अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी प्रमोद मारोती बावने वय ३५ वर्ष रा. मारेगाव तर्फे पोहवा रामेटेके पोस्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी.सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहे.

**४) निष्काळजीपने वाहन चालवुन इसम स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक २८/०१/२०१७ रोजी चे ०७.३० ते ०८.३० वा. दर. यातिल आरोपी मृतक मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही ०७३८ चा चालकाने प्रल्हाद चांगोराव वघरे वय २६ वर्ष रा. सिंधपुरी पोलीस स्टेशन सिहोरा याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने व भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन स्वत:चालवुन अपघात करून स्वत:चे मरणास कारनीभुत झाल्याने फिर्यादी पृथ्वीराज नागोराव वघरे वय ४२ वर्ष रा. चिचोली पोलीस स्टेशन तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ), भादवी.सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी जाधव पो. स्टे. तुमसर हे करीत आहे.

**५) सार्वजनीक ठिकानी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०१/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील कमांडर मॅक्स गाडी क्र. एमएच ३५ ई ११८३ ही रोडवर उभे करून रहदारीस अडथळा निर्माण होवुन धोका निर्माण होईल तसेच सोबत गाडीचे मुळ कागजपत्र जवळ न बाळगतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. धावळे पो.स्टे. तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भांदवी.सहकलम १३९/१७७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रार्घोते पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) सार्वजनीक ठिकानी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०१/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील महीन्द्रा मॅक्स गाडी क्र. एम.पी. २० एस.डी. ६१३७ चा चालक ही रोडवर उभे करून रहदारीस अडथळा निर्माण होवुन धोका निर्माण होईल तसेच सोबत गाडीचे मुळ कागजपत्र जवळ न बाळगतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. धावळे पो.स्टे. तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भांदवी.सहकलम १३९/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रार्घोते पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक २८/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर , भंडारा , साकोली, आंधळगाव , पवनी व लाखनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८८ लिटर हातभट्टी दारु किमती ७,१००/–रु. व १ लिटर २४० मिलीलीटर देशी दारू कि.७,३९०/–रू तसेच जुगारातुन ४३,०७७/–रू असा एकुन ५०,४६७/–रू माल जप्त करण्यात आला आहे.

**सपोनि. के. एम.हत्तीमारे**
**जि. वि. शा भंडारा करीता**
**दुरध्वनी.क. ९४२२८३२१७८**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.